**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरूर नगरपरिषद, ता.शिरूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०२८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले
तर्डोबाची वाडी, ता.शिरूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त(सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्री.सुभाष गोसावी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
शिरूर नगरपरिषद, ता.शिरूर, जि.पुणे श्री.शिवाजी शंकरराव कापरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अतिक्रमीत जागा विकण्याचा अधिकार नगरपालिकेला आहे किंवा नाही, याबाबतची देऊ करण्यात आलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे आपण घेतली नाही, असे अपीलकर्ता श्री.ज्ञानेश्वर मुरलीधर भोसले यांनी सांगितले.

श्री.भोसले यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत देऊ करण्यात आली होती. कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. माहिती वाचली, परंतु अपुरी असल्याचे सांगून घेतली नाही. वीज कनेक्शनच्या संदर्भात त्यांनी उपस्थित केलेले मुद्दे निराधार आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद, जि.पुणे श्री.शिवाजी शंकरराव कापरे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

शुल्क न भरणे व देऊ केलेली माहिती न स्वीकारणे ही अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. जन माहिती अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास माहिती द्यावी व आवश्यक असल्यास अपीलकर्त्याने ती स्वीकारावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. परंतु श्री.भोसले यांनी अद्यापपर्यंत माहिती घेतलेली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, शिरूर नगरपरिषद, जि.पुणे श्री.शिवाजी शंकरराव कापरे यांनी दि.१८.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.विष्णु टिबडेवाल
साईवृंदा, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी**
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,
५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४३/पुणे /२००९ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.१०.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विष्णु टिबडेवाल
साईवृंदा, घोले रोड, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
श्री.बी.ए.पाचघरे

**जन माहिती अधिकारी** तथा सहायक व्यवस्थापक,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, ५८३/ब, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे-३७
विद्यमान-श्री.दिपक व्ही.प्रसाद, तत्कालीन-श्री.एम.बी.घाडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.०४.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.०७.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१७.०८.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या वाहन वापर, शिपाई वापर आदिंबाबत आपण मागितलेली माहिती देण्यात जन माहिती अधिकारी तथा सहायक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे हे सतत टाळाटाळ करीत आले आहेत. मागितलेली माहिती विस्तृत आहे. तसेच कोणती माहिती हवी आहे , हे स्पष्ट होत नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे. परंतु आपला अर्ज सुस्पष्ट असून मागितलेली माहिती विस्तृत नाही, हेही आपण विविध पत्रांद्वारे स्पष्ट केले. तथापी वस्तुस्थिती उजेडात येऊ नये म्हणून वेगवेगळ्या कारणांनी माहिती टाळली जात आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.विष्णु टिबडेवाल यांनी केले. अपिलाच्या सुनावणीचे व्हिडिओ शूटींग केले. त्याचे कारण स्पष्ट केलेले नाही, तसेच मागणी करूनही या चित्रीकरणाची प्रत आपल्याला दिलेली नाही, अशीही तक्रार श्री.टिबडेवाल यांनी केली.

श्री.टिबडेवाल यांनी विविध स्वरूपाचे वीस प्रश्न विचारलेले आहेत. कागदपत्रांच्या प्रतींबरोबरच कायदेशीर तरतुदींचीही माहिती त्यांनी विचारली आहे. तसेच भाष्य अथवा स्पष्टीकरणाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येत नसूनही तशा

प्रकारची विचारणाही काही मुद्दयांमध्ये त्यांनी केली आहे. या सर्व बाबी लक्षात घेता श्री.टिबडेवाल यांनी संबंधित अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक माहिती घ्यावी, असे विहित मुदतीत त्यांना कळविण्यात आले, त्यानंतरही तसा पत्रव्यवहार त्यांच्याशी करण्यात आला. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीही त्याची कल्पना दिली. परंतु त्यांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे त्यांना नेमके कशात स्वारस्य आहे, हे नेमके स्पष्ट होत नाही, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.दिपक व्हि.प्रसाद व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एम.बी.घाडगे यांनी संबंधित पत्रव्यवहारांच्या प्रतींसह केले. सुनावणीत न झालेले निर्णय झाल्याचा उल्लेख करून श्री.टिबडेवाल पत्रव्यवहार करतात, त्याबाबतही त्यांना कळविण्यात आले. तसेच वखार महामंडळातील वेगवेगळ्या घडामोडींचे व कार्यक्रमाचे व्हिडिओ चित्रीकरण केले जाते. त्याचाच एक भाग म्हणून अपिलाच्या सुनावणीच्या वेळी व्हिडिओ चित्रीकरण केले, असे अपिलीय प्राधिकारी श्री.बी.ए.पाचघरे यांनी संबंधित पत्रांच्या प्रतींसह नमूद केले. माहिती नाकारलेली नाही, असेही श्री.प्रसाद व श्री.पाचघरे यांनी स्पष्ट केले.

श्री.टिबडेवाल यांनी मागितलेली माहिती सन २००५ पासूनची असून विविध स्वरूपाचा तपशील अपेक्षित असलेली आहे. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती नाकारलेली नाही. अभिलेखांचे अवलोकन करून अपीलकर्ता माहिती घेऊ शकतात.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१२.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. श्रीरंग मारूती जाधव
८०६, कामगार पुतळा, शिवाजीनगर, पुणे-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपआरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०४६ / पुणे |
| २ | सनावणीची तारीख | दि. १७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. श्रीरंग मारूती जाधव
८०६, कामगार पुतळा, शिवाजीनगर, पुणे-५

**अपिलीय प्राधिकारी** तथा आरोग्य प्रमुख,
पुणे महानगरपालिका, पुणे डॉ. धनंजय चांदककर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.५.२००७ |
| ५ | ज माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.७.२००७ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

राज्य माहिती आयोगाने दि. १६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. १७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

वारस प्रमाणपत्राची मूळ प्रत महानगरपालिकेने गहाळ केली व त्रयस्थ व्यक्तीला सर्व रक्कम दिली. ती कोणत्या आधारे दिली गेली याची माहिती जन माहिती अधिकारी तथा उप आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिली नाही. आपल्या वडिलांच्या मृत्यूपश्चात देय असलेल्या रकमांबाबत सन १९८० पासून आपण तक्रारी करीत असून न्यायालयाच्या आदेशाचीही पायमल्ली करुन आपला हक्क डावलला जात आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. श्रीरंग मारूती जाधव यांनी केली.

वारस प्रमाणपत्र संबंधितांनाच मिळते. श्री. जाधव यांनी ते महानगरपालिकेकडे दिल्याचा कोणताही पुरावा नाही. प्रथम अपिलाच्या निर्णयातही हे स्पष्ट करण्यात आले आहे. सन १९७८-पासून महानगरपालिकेतर्फे कै.मारुती जाधव यांच्या मृत्यूपश्चात अदा केलेल्या रकमेची संपूर्ण माहिती श्री. जाधव यांना देण्यात आली आहे, असे जन माहिती अधिकारी तथा उप आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे डॉ. धनंजय चांदककर यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

कै.मारुती जाधव यांच्या मृत्यूपश्चात देय असलेल्या रकमांबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे डॉ. धनंजय चांदककर यांनी दि.१९.५.२००९ च्या पत्रान्वये न्यायालयाच्या निर्णयाच्या व अनुषंगिक कागदपत्रांच्या प्रतींसह अहवाल सादर केला. श्री. जाधव यांना न्यायालयाच्या निर्णयाच्या प्रतीसह सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात आल्या असूनही पुन: पुन्हा त्याच कागदपत्रांसाठी अर्ज करीत असतात व कार्यालयात येऊन विनाकारण वाद घालीत असतात. कै. जाधव यांच्या मृत्यूपश्चात देय असलेल्या रकमा न्यायालयाने दिलेल्या वारस पत्रानुसार श्रीमती कृष्णाबाई मारुती जाधव यांना आदा करण्यात आल्या आहेत व दि.६.२.१९८२ च्या त्यांच्या विनंती अर्जावरुन त्यांना कुटुंब निवृत्ती वेतन सुरु

करण्यात आलेले आहे. श्री. श्रीरंग जाधव आणि श्रीमती कृष्णाबाई मारूती जाधव ऊर्फ श्रीमती कृष्णाबाई यशवंत साबळे यांचेमध्ये वैयक्तिक वाद असावेत. या संदर्भात श्री. श्रीरंग जाधव यांनी श्रीमती कृष्णाबाई जाधव यांचे विरूध्द केलेल्या दाव्याचा निकाल त्यांचे विरूध्द लागलेला आहे. परंतु त्याबाबत त्यांची काही तक्रार / म्हणणे असेल तर त्यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे अथवा महानगर प्रशासनाविरूध्द तक्रार करण्याऐवजी योग्य त्या न्यायालयात दाद मागणे आवश्यक आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे डॉ. धनंजय चांदककर यांनी या अहवालात म्हटले आहे. ते स्वयंस्पष्ट आहे. या संदर्भात श्री. जाधव यांनी वारंवार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये अर्ज व अपिले करणे योग्य नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेंद्र माणिकराव ढमाले
बिल्डिंग नं.६, फ्लॅट नं.५, रूणवाल पॅनोरमा,
मुंबई बेंगलोर हायवे, वारजे, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बेलावडे, ता.मुळशी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.राजेंद्र माणिकराव ढमाले
बिल्डिंग नं.६, फ्लॅट नं.५, रूणवाल पॅनोरमा,
मुंबई बेंगलोर हायवे, वारजे, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती मुळशी, ता.मुळशी, जि.पुणे श्री.वाय.एस.भांड

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बेलावडे, ता.मुळशी, जि.पुणे श्री.आर.टी.गाढवे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.४.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.५.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१७.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

बेलावडे ग्रामपंचायतीच्या निधीबाबतचे सन १९९२ ते २००७ पर्यंतचे बँक स्टेटमेंट आपण मागितले होते. परंतु १९९२ ते १९९६ या काळातील माहिती मिळाली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.राजेंद्र माणिकराव ढमाले यांनी केले.

सन १९९२ ते १९९७ या काळातील दप्तर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत बेलावडे, ता.मुळशी, जि.पुणे श्री.बी.आर.कांबळे यांनी गहाळ केलेले आहे. दि.२३.६.२००७ रोजी त्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मावळ यांना कळविण्यात आलेले असून श्री.कांबळे यांना निलंबित करण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुळशी, जि.पुणे यांनी नमूद केले. श्री.कांबळे यांच्या प्रमाणेच नंतरचे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक बेलावडे, ता.मुळशी, जि.पुणे श्री.जे.बी.जमाले हेही अन्य प्रकरणात निलंबित असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुळशी, जि.पुणे श्री.वाय.एस.भांड यांनी लेखी नमूद केले.

सन १९९२ ते १९९७ या काळातील निधीच्या विनियोगाबाबतची माहिती कागदपत्रांच्या आधारे श्री.ढमाले यांना द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. तथापि, आपल्याला त्यानुसार माहिती न मिळाल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.ढमाले यांनी केली. मात्र बँक स्टेटमेंट तयार केले होते, ते नेण्यासाठी श्री.ढमाले आले नाहीत व त्यांचा पुण्याचा पत्ता माहिती नसल्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. नंतर दि.९.११.२००९ रोजी त्यांनी माहिती घेतली, परंतु

पोहोच दिली नाही. निलंबित ग्रामसेवक श्री.कांबळे यांनी ग्रामपंचायतीकडे दप्तर न दिल्यामुळे अन्य माहिती देता आली नाही, असा खुलासा जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक बेलावडे, ता.मुळशी, जि.पुणे श्री.आर.टी.गाढवे यांनी दि.१६.११.२००९ च्या पत्रान्वये सादर केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२७.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीराम बाबुराव बंडगर
३६५, गरीबी हटाव झोपडपट्टी नं.१, विजापूर नाका,
अग्रवाल दवाखान्यामागे, विजापूर रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव, इंदिरा ज्ञानवर्धिनी, सोलापूर
संचलित, इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, निर्मलाताई ठोकळ प्रशाला,
इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६०+१०९० / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीराम बाबुराव बंडगर
३६५, गरीबी हटाव झोपडपट्टी नं.१, विजापूर नाका,
अग्रवाल दवाखान्यामागे, विजापूर रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष/सचिव, इंदिरा ज्ञानवर्धिनी, सोलापूर
संचलित, इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर
(१)श्री.भिकाजी सुखदेव गाजरे (२)श्री.के.डी.पवार

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापक, निर्मलाताई ठोकळ प्रशाला,
इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर
(१)श्री.दत्तू दामोदर गाजरे (२)श्री.संजय वेणू चव्हाण

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जून १९९६ ते मार्च २००८ अखेर पर्यंतच्या शिष्यवृत्ती संदर्भातील माहिती इंदिरा ज्ञानवर्धिनी, सोलापूर संचलित इंदिरा प्राथमिक शाळा व निर्मलाताई ठोकळ प्रशाला यांच्याकडून मिळाली नाही. समाजकल्याण अधिकाऱ्यांकडेही याबाबतची विचारणा आपण केली आहे. सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती वारंवार मागणी करूनही निर्मलाताई ठोकळ प्रशालेत दिली जात नव्हती. सन २००७ मध्ये आपल्या अर्जानंतर प्रथमच ती दिली गेली. निर्मलाताई ठोकळ प्रशालेच्या जन माहिती अधिकाऱ्यांनी आपला अर्ज समक्ष स्वीकारला नाही, टपालाने पाठविण्यास सांगितले. अर्ज केल्यानंतर घरोघरी जाऊन शिष्यवृत्ती मिळाल्याच्या विद्यार्थ्यांच्या सह्या घेतल्या. त्यावर खोट्या तारखा घातलेल्या आहेत. या गैरप्रकाराबद्दल संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.श्रीराम बाबुराव बंडगर यांनी केली.

आपल्या प्रशालेला इयत्ता पाचवी ते सातवी या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी जून २००३ पासून अद्यापपर्यंत कोणतीही शिष्यवृत्ती मिळालेली नाही. तसे आपण श्री.बंडगर यांना कळविले होते. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांबाबतची माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी म्हटले आहे, परंतु आपली शाळा पहिली ते सातवीपर्यंत असल्यामुळे या माहितीचा प्रश्न येत नाही, असे लेखी व तोंडी

प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निर्मलाताई ठोकळ प्रशाला व इंदिरा प्राथमिक शाळा, इंदिरानगर, सोलापूर श्री.संजय वेणू चव्हाण यांनी केले. (अपील क्र.१०९०)

श्री.बंडगर यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यांना शुल्क भरण्याबाबत कळविले. परंतु त्यांनी शुल्क भरले नाही व माहितीही नेली नाही. त्यानंतर त्यांनी पुन्हा अपिलीय प्राधिकाऱ्याचा नाव, पत्ता मिळण्यासाठी अर्ज केला त्याचीही माहिती त्यांना देण्यात आली. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी देऊ केलेली माहिती घेण्यास त्यांनी नकार दिला. तसेच यापूर्वी आमच्या संस्थेकडून माहिती घेऊन त्यांनी संस्थेची बदनामी करणाऱ्या बातम्या वृत्तपत्रांना दिल्या. श्री.श्रीराम बाबूराव बंडगर व सौ.निलावती श्रीराम बंडगर यांनी आपल्या घरी येऊन तक्रारी अर्ज वाचून न दाखविता फसवणूक करून सह्या घेतल्या, असे प्रतिज्ञापत्र शिष्यवृत्तीच्या संदर्भात तक्रार करणाऱ्या अर्जावर नावे असलेल्या व्यक्तिंनी दिले आहे. शाळेत शिष्यवृत्तीमध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या कारणावरून श्री.बंडगर यांनी काही व्यक्तींना समाजकल्याण खात्याकडे चौकशीसाठी जाण्यास सांगितले. त्यानुसार विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांच्या कार्यालयाकडून चौकशी होऊन सर्व पात्र मुलींना चेकने शिष्यवृत्ती मिळाली असल्याचे व सर्व नोंदी अद्ययावत असल्याचे समाजकल्याण निरीक्षकांनी अहवालात नमूद केले आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निर्मलाताई ठोकळ प्रशाला, इंदिरानगर, सोलापूर दत्तू दामोदर गाजरे यांनी केले. श्री.बंडगर केवळ त्रास देण्याच्या हेतूने अशा प्रकारचे अर्ज करतात. माहितीच्या अधिकाराचा वापर करून, दबाव आणून पैशाची मागणी करतात व धमक्या देतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, इंदिरा ज्ञानवर्धिनी, सोलापूर संचलित, इंदिरानगर, विजापूर रोड, सोलापूर श्री.श्री.भिकाजी सुखदेव गाजरे यांनी केले. श्री.बंडगर यांच्या विरूध्द आपण फौजदारी गुन्हा दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दबावाच्या व पैसे मागण्याच्या आरोपाचा श्री.बंडगर यांनी इन्कार केला. तसेच संस्थेकडून कोणतीही पत्रे आपल्याला मिळाली नसल्याचे त्यांनी सांगितले.

श्री.बंडगर यांना पाठविलेल्या पत्रांच्या छायांकित प्रती व जावक बारनिशीतील नोंदीची छायांकित प्रत आयोगाला सादर करण्याचे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, निर्मलाताई ठोकळ प्रशाला, इंदिरानगर, सोलापूर श्री.दत्तू दामोदर गाजरे यांनी दि.१०.२.२००९ च्या पत्रान्वये या प्रती आयोगाला सादर केल्या. काही ठराविक पत्रे न मिळाल्याची तक्रार श्री.बंडगर करतात, असे कागदपत्रांवरून दिसून येते.

शिष्यवृत्तीच्या वाटपातील गैरप्रकाराचे श्री.बंडगर यांचे आरोप व श्री.बंडगर पैशाची मागणी करून धमकावत असल्याचे निर्मलाताई ठोकळ प्रशालेचे जन माहिती अधिकारी श्री.दत्तू दामोदर गाजरे व अपिलीय प्राधिकारी श्री.भिकाजी सुखदेव गाजरे यांचे आरोप याची शहानिशा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. त्यासाठी संबंधितांना योग्य त्या प्रशासकीय / न्यायिक कार्यवाहीचा मार्ग उपलब्ध आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. बबनराव राजाराम कोकरे
रा. धुमाळवाडी, पो. पणदरे,
ता. बारामती, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
पुणे पाटबंधारे मंडळ, पुणे- ११

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
पुणे पाटबंधारे विभाग, गोळीबार मैदानानजिक,
खडकवासला कॅनॉल, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०९९ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.३.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.५.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - १) सन १९९० ते २००९ या कालावधीत सिंचनासाठीचा पाट मोडल्याबाबत जबाबदार व्यक्तीवर केलेल्या कारवाईची माहिती तसेच पाणी अडविण्याऱ्या व्यक्तीवर म.पा.अ.नि. १९७६ च्या कलम ९३ अन्वये केलेल्या कारवाईची माहिती. २) या संदर्भातील दि. १०/२/२००९ व दि. १६/२/२००९ च्या पत्रांची सत्यप्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. बबनराव राजाराम कोकरे यांनी यापूर्वी याच विषयाबाबत आयोगाकडे केलेल्या अपिलावर आयोगाने निर्णय दिलेला आहे, तोच येथेही लागू आहे

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२५- ११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सतीश पांडुरंग साळुंखे
मु. पो. हतीज, ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्य) ,
जिल्हा परिषद, सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११०५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता -** श्री. सतीश पांडुरंग साळुंखे<br>मु. पो. हतीज, ता. बार्शी, जि. सोलापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्य),<br>जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम. एन. वीर | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२४.४.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची जोडपत्र-अ प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.१०.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या पगाराच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री. सतीश पांडुरंग साळुंखे यांनी मागितली होती. विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले, परंतु समाधानकारक माहिती न मिळाल्याच्या कारणावरून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. वीस दिवसांत त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती देण्याबाबत दि. १९.११.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त उभय घटकांचे एकमत झाले होते. त्यानुसार दि. १३.१२.२००८ रोजी त्यांना माहिती देण्यात आली, असा अहवाल संबंधित माहितीच्या प्रतीसह शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन.वीर यांनी सुनावणीच्या वेळी आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १६.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हाजी महंमद फारूख निसार शेख
५२६, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त (म),
सोलापूर महानगरपालिका — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११११५ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.५.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हाजी महंमद फारूख निसार शेख
५२६, न्यू पाच्छा पेठ, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा नगर अभियंता,
सोलापूर महानगरपालिका श्री.सु.ब.सावस्कर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.६.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.५.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.६.३००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१९.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.७.५.२००९ रोजी घेण्यात आली.

सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाची असलेली जागा बळकावण्याचा बिल्डरांचा प्रयत्न असल्यामुळे त्याबाबतची आपण मागितलेली माहिती देण्यात जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका यांनी टाळाटाळ केली. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(म), सोलापूर महानगरपालिका यांनी जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर योग्य ठरवून १५ दिवसात माहिती नि:शुल्क देण्याचे आदेश दिले. त्यानंतरही वारंवार स्मरण देऊनही आपल्याला पूर्ण माहिती मिळाली नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त नमूद करूनही मुदतीत माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.हाजी महंमद फारूख निसार अहमद शेख यांनी केले.

श्री.हाजी महंमद फारूख निसार शेख यांनी महानगरपालिकेच्या आरोग्य अधिकाऱ्यांकडे अर्ज केला होता. आरोग्य अधिकाऱ्यांनी उत्तर पाठविले, परंतु ते आपल्याला मिळाले नाही, असे श्री.शेख यांचे म्हणणे आहे. आरोग्य अधिकाऱ्यांनी हा अर्ज नगर अभियंता कार्यालयाकडे वर्ग करावा असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त(म), सोलापूर महानगरपालिका यांनी दिले. त्यानुसार हा अर्ज आपल्याकडे आला, परंतु शहरातील सर्व नाले जिल्हाधिकारी याच्या कक्षेतील असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला व तसे श्री.शेख यांना कळविले. एका नाल्यावर

'बांधा वापरा व हस्तांतर करा' या तत्त्वावर चालू असलेल्या कामाची माहितीही श्री.शेख यांना दिली. माहिती लपविण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.सु.ब.सावस्कर यांनी केले. अपीलकर्ता श्री.शेख यांनी अन्य आवश्यक माहितीसाठी अभिलेखाचे अवलोकन करावे व त्यानुसार त्यांनी मागितलेली माहिती नि:शुल्क द्यावी असे ठरले होते. त्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली, असेही त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शहरातील नाल्यांचे नकाशे प्राप्त करून घेऊन श्री.शेख यांना नि:शुल्क द्यावेत, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कार्यवाही पूर्ण केली असल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर अभियंता, सोलापूर महानगरपालिका श्री.सु.ब.सावस्कर यांनी दि.२८.१०.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्रीमती योगेश्री मकरंद फडके
'क्षितीज' प्लॉट क्र.७, सेक्टर बी,
वृंदावन को.ऑप.सो., पंचवटी, पाषाण,पुणे ४११ ००८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** सह जिल्हा निबंधक (वर्ग-१)
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५ फायनान्स रोड, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
सह दुय्यम निबंधक हवेली क्र.४,
दुय्यम निबंधक कार्यालय, ईशाना II इमारत, पौड रोड, कोथरुड, पुणे-३८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३७/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह जिल्हा निबंधक (वर्ग-१)
व मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर, ५ फायनान्स रोड, पुणे-१ श्री.जी.बी.भुरकुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा सह दुय्यम निबंधक हवेली क्र.४, दुय्यम निबंधक कार्यालय,
ईशाना II इमारत, पौड रोड, कोथरुड, पुणे-३८ श्रीमती व्ही.एस.कुलकर्णी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०४.२००७ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपिलीय प्राधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित राहिल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्त्या श्रीमती योगेश्री मकरंद फडके यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. खरेदीखताचा सन १९९५ चा मूळ दस्तऐवज त्यांनी मागितला होता. या काळात राज्यात एकच फोटो रजिस्ट्री विभाग होता. मूळ दस्तऐवजाबाबतची माहिती त्यांना वेळीच कळविण्यात आली होती. तसेच शोध घेऊन त्यांना त्यांचे मूळ दस्तऐवज घरपोच देण्यात आले, असे त्यांची पोहोच असलेल्या पत्रासह जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.४, पौड रोड, कोथरूड, पुणे श्रीमती व्ही.एस.कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी तथा सह जिल्हा निबंधक(वर्ग-१), मुद्रांक जिल्हाधिकारी, पुणे शहर श्री.जी.बी.भुरकुंडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्रीमती फडके यांच्या अर्जातील अन्य माहितीही त्यांना देण्यात आलेली आहे, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.चंद्रकांत सदाशिव गुरव
मु.होलेवाडी, पो.राजगुरूनगर, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता.खेड, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (बांधकाम),
पंचायत समिती खेड, ता.खेड, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४४/ पुणे / २०० |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.एस.डी.मुंडे

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता (बांधकाम),
पंचायत समिती खेड, ता.खेड, जि.पुणे श्री.भा.न.लांडेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पाच महिने मजुरांनी केलेल्या कामाच्या हजेरीपत्रकाची प्रत न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.चंद्रकांत सदाशिव गुरव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.गुरव यांनी मागितलेली माहिती ग्रामपंचायतीकडे असते. तसे श्री.गुरव यांना कळविले होते. ग्रामपंचायतीशी त्यांनी संपर्क साधल्यास ग्रामपंचायत माहिती देण्यास तयार आहे. छोटे पाटबंधारे विभागाकडील माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.भा.न.लांडेकर व अपिलीय प्राधिकारी श्री.एस.डी.मुंडे यांनी केले.

आपण ग्रामपंचायतीचे सदस्य होतो. परंतु आपल्याला लिहिता-वाचता येत नसल्यामुळे, गावचे सरपंच, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी यांनी सहा ते सात लाख रूपयांचा भ्रष्टाचार केला आहे. बंधाऱ्याचे काम न करता खोटे हजेरीपत्रक भरून हा भ्रष्टाचार करण्यात आला असून विस्तार अधिकारी श्री.के.बी.नेहरे यांनी खोटा अहवाल दिला आहे, असे श्री.गुरव यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. या अनुषंगाने विविध पातळ्यांवर माहिती मागणारे अर्ज त्यांनी केले असून, हजेरीपत्रकासह संबंधित माहिती त्यांना देण्यात आली असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरून दिसते. मात्र हजेरीपत्रके बनावट आहेत का, या कामात भ्रष्टाचार झाला का, हे या कागदपत्रांवरून सिध्द होण्याबाबतची कार्यवाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. त्यासाठी अपीलकर्त्यास उचित न्यायासनाकडे दाद मागावी लागेल.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१२.११.२००९

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. दादाभाऊ भगवंता गुंजाळ
मु. रानमळावाडी, पो. वेल्हा, ता. जुन्नर,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती जुन्नर, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत रानमळावाडी, पो. वेल्हा, ता. जुन्नर जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४९ / २००९ / पुणे |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - सन जानेवारी २००८ ते ३१/५/२००९ या कालावधीतील रानमळावाडी ग्रामपंचायतीची ग्रामसभा, त्यातील ठराव, ग्रामपंचायतीचे लेखा परिक्षण अहवाल, बँकेचा खातेउतारा, ग्रामपंचायत सदस्यांचे हजेरी पत्रक इ. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दादाभाऊ भगवंता गुंजाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.२५ - ११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. नंदकुमार तुकाराम जाधव
दत्तमंदिराशेजारी, वसंतनगर,
मु. पो. बारामती, जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विभाग नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे कार्यालय,
शंकरशेट रोड, पुणे - ३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विभाग निमंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांचे कार्यालय,
शंकरशेट रोड, पुणे - ३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५० / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.५.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.५.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - राज्य मार्ग परिवहन विभागीय कार्यालय, बारामती येथील प्रमुख कारागीर (यांत्रिकी) हे पद सन २००५ पासून ज्या निकष व नियमाच्या आधारे गोठविण्यात आले त्यानुषंगाने माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. नंदकुमार तुकाराम जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रावरुन त्यांनी प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील करावे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**स्थळ :- पुणे**
**दि.२५ - ११ -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उद्योग सहसंचालक,
शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१०.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.विकास भिमराव गायकवाड
मु.पो.वडापुरी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उद्योग सहसंचालक,
शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.व्ही.भगत

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,
शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे श्री.पी.बी.साटम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.६.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.९.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १.९.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२१.१०.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

राजर्षि शाहू प्रशिक्षण कार्यक्रमासंबंधी आपण मागितलेली माहिती विहित मुदतीत व संपूर्ण दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.विकास भिमराव गायकवाड यांनी केली.

कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती दिली, परंतु श्री.गायकवाड यांनी मागितलेली माहिती विविध प्रशिक्षण संस्थांकडून संकलित करून छाननी करून द्यावयाची होती, त्यामुळे विलंब झाला. प्रथम अपिलाच्या वेळी माहिती पुन्हा देण्यात आली. या कार्यक्रमातील काही संस्था स्वयंसेवी संस्था / प्रशासकीय संस्था आहेत. त्यांच्याकडील कर्मचारीविषयक बाबींची माहिती आपल्या अखत्यारित येत नसल्यामुळे देणे शक्य झाले नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे श्री.पी.बी.साटम व अपिलीय प्राधिकारी तथा उद्योग सहसंचालक, शेतकी महाविद्यालय आवार, शिवाजीनगर, पुणे श्री.एम.व्ही.भगत यांनी केले.

शासकीय निधीद्वारे शासकीय कार्यक्रम राबविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडील अशा कार्यक्रमाविषयीची माहिती दिली जाणे आवश्यक आहे. त्यानुसार माहिती द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.गायकवाड यांना दि.१०.११.२००८ रोजी रजिस्टर्ड टपालाने ऊर्वरित माहिती पाठविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा

महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पुणे श्री.पी.बी.साटम यांनी दि.३०.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. दिनानाथ केशव बन
"केशवकुंज", २५/१/१, शिवराजनगर,
राहाटणी, पुणे -१७

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** कुलसचिव,
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११५३/२००९ + ११५४/२००९/ पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.३.२००९ व २३.३.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.४.२००९ व दि. १.४.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.४.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.५.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>**(अ)अपील क्र. ११५३ / २००९ / पुणे**<br>१) ४/४/१९९७ पुर्वी व तद्नंतर तक्रारअर्जांचे मुल्यमापन शहानिशा केलेल्या कागदपत्रांच्या प्रती.<br>२) विद्यापीठाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करण्यासंदर्भातील कार्यवाहीबाबतच्या एकूण ९ मुद्द्यांची माहिती.<br>**(ब)अपील क्र. ११५४ / २००९ / पुणे** .<br>१) विद्यापीठातील एखाद्या कर्मचाऱ्याने विद्यापीठ आवारात अथवा आवाराबाहेर भ्रष्टाचार, अनैतिक वर्तणूक, अथवा गैरप्रकार केल्यास त्यास विद्यापीठाचे कोणते अधिकारी जबाबदार असतात ते स्पष्ट करणाऱ्या नियमाची प्रत<br>२) सदर गैरवर्तनास विद्यापीठाची कितपत जबाबदारी असते, याबाबतचा खुलासा किंवा नियमाची प्रत.<br>३) अशा गैरवर्तनाबाबत एखाद्याने तक्रार केल्यास तक्रारदारास पुरावा मागण्याच्या अथवा न मागण्याच्या नियमाची प्रत. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिनानाथ केशव बन यांच्या माहिती-मागणी अर्जांवर जन माहिती अधिकारी पुणे विद्यापीठ यांनी अनुक्रमे दि. ११.४.२००९ व दि. १.४.२००९ रोजीच्या पत्रान्वये मुद्देनिहाय दिलेले उत्तर, तसेच अपीलकर्ता यांनी अर्जान्वये मागणी केलेली व विद्यापीठ कार्यालयात उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यांस दिलेली असल्याने अपिले निकाली काढण्याचा अपिलीय प्राधिकारी यांचा दिनांक २७/५/२००९ रोजीचा निर्णय योग्य असल्याने कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि.२५-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवकुमार काळूराम यादव
स.नं.१५३अ, भोरीपडळ, हडपसर, पुणे-१३ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
ड विभाग, अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १११५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी,
शासकीय मध्यवर्ती इमारत, पुणे प्रतिनिधी श्री.आर.एम.सोनवणे

**जन माहिती अधिकारी** तथा परिमंडळ अधिकारी,
ड विभाग, अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, पुणे श्री.पी.एम.ओंब्रायणी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.१०.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.७.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री.महादेव दत्तू ढेरे यांनी शिधापत्रिकेसाठी केलेला अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे यांच्या प्रती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री.शिवकुमार काळूराम यादव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.ढेरे यांनी खोटी कागदपत्रे करून दोन शिधापत्रिका मिळविल्या आहेत. अभिलेखात शोध घेऊनही श्री.ढेरे यांची सन २००४ मधील कागदपत्रे सापडली आहेत. शिधापत्रिकेसाठी त्यांचा नवीन अर्ज व कागदपत्रे आली आहेत. ती देता येतील, असे जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, ड विभाग, अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, पुणे श्री.पी.एम.ओंब्रायणी यांनी नमूद केले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त व आयोगापुढील सुनावणीलाही अपीलकर्ता उपस्थित नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक अन्नधान्य वितरण अधिकारी, पुणे यांचे प्रतिनिधी श्री.आर.एम.सोनवणे यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा परिमंडळ अधिकारी, ड विभाग, अन्नधान्य वितरण अधिकारी यांचे कार्यालय, पुणे यांच्याकडून संबंधित कागदपत्रांबाबतचा खुलासा मागवावा. श्री.ढेरे यांनी नव्याने दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार कागदपत्रांच्या प्रती श्री.यादव यांना पाठविण्यात आल्याचा अहवाल संबधित कागदपत्रांच्या प्रतीसह परिमंडळ अधिकारी, ड विभाग यांनी दि.२४.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला. श्री.ढेरे यांच्या शिधापत्रिकेवर आपली सही

असून त्यासोबतची कागदपत्रे नेहमीप्रमाणे रॅकवर ठेवली होती. शिधापत्रिकांसंबंधीची कागदपत्रे नेहमी उघड्या रॅकवर ठेवली जातात. ती जपून ठेवण्यासाठी कपाट अथवा लॉकर नाही, त्यामुळे कागदपत्रे आढळ होत नाहीत, असा लेखी खुलासा तत्कालीन सहाय्यक परिमंडळ अधिकारी, ड विभाग श्रीमती पी.बी.लग्गनवार यांनी दि.२४.२.२००९ च्या पत्रान्वये केला. तो मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२६.११.२००९**